Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागामध्ये अध्यापनाचे कामकाज करणाऱ्या सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) यांना मान्यता देण्याच्या अनुषंगाने नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नियमावलीस दि. ०५/०२/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेली आहे. सदरची नियमावली सोबत माहितीसाठी, उचित कार्यवाहीसाठी व कायमस्वरूपी दप्तरी नोंदीसाठी पाठविण्यात आली आहे. तरी सदर नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

**आपल्या अधिविभागामध्ये कार्यरत असणाऱ्या नियमित शिक्षक, हंगामी शिक्षक, Adjunct व Research Professor, Research Fellow यांना देण्यात आलेल्या कार्यभारामधून जर कार्यभार शिल्लक राहत असेल तर आवश्यकतेनुसार सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) यांच्या मान्यतेचा प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या दोन्ही सत्रांसाठी दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत पाठवून देण्यात यावा. तसेच एकाच अधिविभागातील विविध अभ्यासक्रमांचे व शाखांचे प्रस्ताव वेगवेगळे पाठविण्यात येवू नयेत, ते एकत्रित पाठवावेत.**

प्रस्ताव पाठविताना तो सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे अचूक असावा. प्रस्तावासोबत वेळापत्रक जोडण्यात यावे. प्रस्तावामध्ये संबंधित सहयोगी शिक्षकांची माहिती पूर्ण व बिनचूक भरावी. विभागामधील कार्यरत शिक्षकांना देण्यात आलेला कार्यभार पदनिहाय नमुद करण्यात यावा. सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) यांना अध्यापनासाठी आमंत्रित करण्यापूर्वी या विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. U.G.C. आणि AICTE यांच्या निर्देशानुसार अर्हता धारक नसलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव सादर करू नयेत. अर्हता धारक नसलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास, त्यांना सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यता दिली जाणार नाही. तसेच अपूर्ण प्रस्ताव स्विकारला जाणार नाही. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दोन्ही सत्रांसाठी एकाच वेळी विहित केलेल्या कालावधीत प्रस्ताव सादर करण्यात यावेत. वर्षातून दोनदा सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात येवू नयेत. येथून पुढे कार्योत्तर मान्यतेसाठी आलेल्या प्रस्तावांना मान्यता दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच अधिविभागाच्या स्तरावर परस्पर सहयोगी शिक्षकांना (Contributory Teacher) निमंत्रित करू नये. याबाबत संबंधितांच्या मानधनाबाबत भविष्यात अडचणी निर्माण झाल्यास संबंधित अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक त्यास जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

आदेशावरून,

कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/पीजी/ 2801
दिनांक : 21 MAR 2024

प्रति:

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक,
विद्यापीठ अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
-\ सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

२. मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरू व मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे कार्यालयास माहितीसाठी.

D:\Contributory Teacher\Contri. Teacher Honorarium SUB. & Circular

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) नियमावली

१) महाविद्यालयामध्ये / विद्यापीठामध्ये पूर्णवेळ / हंगामी शिक्षक कार्यरत आहेत, त्यांना अतिरिक्त म्हणून अन्य अभ्यासक्रमास प्रतिसप्ताह ०४ तासिकांचे सहयोगी शिक्षक / Contributory Teacher म्हणून अध्यापन करता येईल. त्यांना विद्यापीठ नियमानुसार मानधन देय राहील.

२) सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) पूर्णवेळ (हंगामी / कायम) कोणत्याही आस्थापनेवर कार्यरत नसेल व फक्त सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून कार्यरत राहणार असेल, तर त्यांना प्रतिसप्ताह कमाल ०६ तासिकांचा कार्यभार देता येईल. परंतु, AICTE च्या अधिपत्याखालील येणारे अभ्याक्रमांना सदरची अट विशेष परिस्थितीत लागू राहणार नाही. तथापि, संबंधित शिक्षकाचे एकूण मासिक मानधन हे हंगामी सहायक प्राध्यापकाच्या मासिक मानधनापेक्षा जास्त होणार नाही, याची काळजी संबंधित अधिविभागाने घ्यावी.

३) अन्य महाविद्यालयामधील / शासकीय कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना सहयोगी शिक्षक / Contributory Teacher म्हणून मान्यता दिल्यानंतर १५ दिवसाच्या अवधीमध्ये त्यांनी त्यांच्या कार्यरत आस्थापनेच्या परवानगीचे पत्र संबंधित अधिविभागप्रमुखांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४) सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून विहित अर्हता धारण करणाऱ्या या विद्यापीठामधील प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांना अध्यापनाचे काम करतांना प्रतिसप्ताह ०६ तासिकांची मर्यादा असेल आणि त्यांनी सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज हे कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त करावे आणि त्याचा परिणाम त्यांच्या कार्यालयीन कामकाजावर होणार नाही याची काळजी घ्यावी. त्यांना विद्यापीठ नियमानुसार मानधन देय राहील. तरी याबाबत प्रकरण निहाय निर्णय घेण्यात येतील.

५) अधिविभागामधील सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यतेसंदर्भात अधिविभागामधील अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय कार्यभार, पूर्णवेळ आणि हंगामी शिक्षकांना देण्यात आलेला कार्यभार व शिल्लक कार्यभार याबाबतची माहिती विहित नमुन्यामधील तक्त्यामध्ये आस्थापना पी.जी. विभागास सादर करण्यात यावी.

६) एक किंवा एकापेक्षा अधिक स्कूल / अधिविभागांमध्ये विविध प्रोग्रामसाठी एकाच विषयाचा कार्यभार दिसून येत असेल, तर तो एकत्रित शिकवण्याबाबत संबधित संचालक / समन्वयक / अधिविभागप्रमुखांनी निर्णय घ्यावा.

७) विविध अधिविभागांकडून पुढील शैक्षणिक वर्षाचे सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यतेचे प्रस्ताव हे दरवर्षी ३१ मार्च पूर्वी मागविण्यात यावेत.

८) छात्रवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांना संबधित वित्तीय संस्थेच्या नियमानुसार कार्यभार देण्यात यावा. त्यांना सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून मान्यता देण्यात येवू नये.

Cont...

सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) मान्यतेसंदर्भात प्रस्ताव पाठविण्याबाबतचा विहित नमुन्यामधील तक्ता-

| अधिविभाग / स्कूल / केंद्र / अध्यासनाचे नाव :- | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अभ्यासक्रमाचे नाव :- | | | | | |
| अभ्यासक्रमाचा एकूण कार्यभार :- | | | | | |
| | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | भरलेल्या पदांनुसार कार्यरत शिक्षकांना प्रमाणकांनुसार देण्यात आलेला शैक्षणिक कार्यभार | रिक्त पदांच्या अनुषंगाने शिल्लक असलेला कार्यभार |
| प्राध्यापक | | | | | |
| सहयोगी प्राध्यापक | | | | | |
| सहाय्यक प्राध्यापक | | | | | |
| हंगामी सहाय्यक प्राध्यापक | | | | | |
| Adjunct Prof./Research Prof. | | | | | |
| सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) | | | | | |
| Project fellow / Research fellow with fellowship | | | | | |
| Teaching Assistant | | | | | |
| एकूण | | | | | |

तसचे, सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून आमंत्रित करण्यात येणाऱ्या शिक्षकांची माहिती खालील नमुन्यामध्ये तयार करून पाठविण्यात यावी.

| अ. क्र. | सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून नेमावयाच्या शिक्षकाचे पूर्ण नाव व पत्ता | धारण करीत असलेली शैक्षणिक अर्हता | अनुभव | कोणत्या अभ्यासक्रमाचा कोणता विषय शिकविण्यासाठी आमंत्रित करणार आहे याचा तपशील | विद्यापीठामध्ये / महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ / हंगामी शिक्षक म्हणून कार्यरत असल्यास त्याचा तपशील | मानधन आदा करण्यासाठी अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतूद केली आहे काय. अंदाजपत्रकीय शिर्षक नमूद करावे. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

वरीलप्रमाणे प्रस्ताव पाठवित असताना खालील बाबींचे अनुपालन करावे -

(i) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) / अखील भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) च्या नियमावलीस अनुसरून संबंधित उमेदवारांची शैक्षणिक अर्हता अधिविभाप्रमुख / समन्वयक यांचे स्तरावर प्रमाणित करण्यात यावी.

(ii) आस्थापना पी.जी. विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकानुसार सहयोगी शिक्षक / Contributory Teacher यांचे मानधन देयक लेखा विभागास सादर करावे. सैध्दांतिक (Theory) आणि प्रात्यक्षिके (Practical) यांच्या तासिकांची परिगणना ही ठरलेल्या प्रतितासिका ६० मिनिटांप्रमाणे नियमानुसार असेल. अधिविभाग एक प्रात्यक्षिक (Practical) १२० मिनिटे किंवा १८० मिनिटे त्या त्या अभ्यासक्रमानुसार घेऊ शकेल.

(iii) सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) यांचे प्रवास भत्ता, दैनंदिन भत्ता अथवा अन्य भत्ता देय नाही, याची नोंद घ्यावी.

(iv) एखादी व्यक्ती विद्यापीठातील एखाद्या अधिविभागामधील अभ्यासक्रमासाठी हंगामी / कंत्राटी शिक्षक कार्यरत असेल, तर त्याच अभ्यासक्रमासाठी संबंधित व्यक्तीची सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून नेमणूक करण्यासंदर्भात मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येवू नये.

जा.क्र. आस्थापना/पी.जी./2801-A
दिनांक : 21 MAR 2024

डॉ. व्ही. एन. शिंदे,
कुलसचिव

D:\Contributory Teacher\Contri. Teacher Honorarium SUB. & Circular